# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांक : 03.10.2026** **वार : शनिवार**

---

1. जागतिक व्यापारातील असमतोल दूर करण्यासाठी डब्ल्यूटीओच्या नियमांचं पालन करण्याचं वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांचं जी वीस देशांना आवाहन
2. भारताच्या हरित ऊर्जा मार्गिका योजनेचं संयुक्त राष्ट्रांकडून कौतुक
3. बालसंगोपनासाठीच्या रजांबाबत राष्ट्रीय महिला आयोगाकडून केंद्र सरकारला विविध शिफारशी
4. पुण्यातील डेक्कन महाविद्यालयात मराठी भाषा अध्ययन उत्कृष्टता केंद्र स्थापन करण्यासाठी केंद्र सरकारची मंजुरी आणि
5. आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंची दमदार कामगिरी; पदकतालिकेत भारताची पाचव्या स्थानावर झेप

**WTO-पीयूष गोयल**

जागतिक व्यापारातील असमतोल दूर करण्यासाठी WTO अर्थात जागतिक व्यापार संघटनेच्या नियमांचं पालन करण्याचं आवाहन भारतानं केलं आहे. अमेरिकेतील मिलवॉकी इथं झालेल्या G-20 व्यापार मंत्र्यांच्या बैठकीच्या समारोपाप्रसंगी, केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री यांनी भारताची भूमिका मांडली. काही देशांमधील सरकारी पाठिंब्यामुळं अतिरिक्त उत्पादन होऊ शकतं, त्यामुळं डंपिंग' अर्थात इतर देशांच्या बाजारपेठांमध्ये अति-स्वस्त दरात मोठ्या प्रमाणावर माल विक्रीची समस्या उद्भवू शकते. अशा परिस्थितीचा सामना करण्यासाठी WTO नियमांनुसार 'अँटी-डंपिंग' शुल्क आणि इतर आवश्यक उपाययोजना लागू केल्या जाऊ शकतात असं गोयल यांनी नमूद केलं.

**संयुक्त राष्ट्र-भारत ग्रीन एनर्जी**

केंद्रीय मंत्रिमंडळानं 1 लाख 86 हजार कोटी रुपयांच्या हरित ऊर्जा मार्गिकेच्या तिसऱ्या टप्प्याला दिलेल्या मंजुरीचं संयुक्त राष्ट्रांनी स्वागत केलं आहे. ही योजना देशातील जनता आणि अर्थव्यवस्थेसाठी फायदेशीर ठरेल, असंही संयुक्त राष्ट्रांच्या हवामान बदल विभागाचे कार्यकारी सचिव सायमन स्टिल यांनी एका वृत्तसंस्थेला दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे. वीज ग्रीड बळकटीकरण आणि बॅटरी स्टोरेजच्या या उपक्रमामुळं भारताला आपली वाढती अक्षय ऊर्जा क्षमता वापरण्यास आणि विजेची वाढती गरज पूर्ण करण्यास मदत मिळेल. तसंच सौर ऊर्जेच्या क्षेत्रात जागतिक पातळीवर आघाडीवर राहण्यासाठी हा प्रकल्प उपयुक्त ठरेल असं स्टिल यांनी म्हटलं आहे.

**G7**

इंधनाचे वाढते दर कमी करण्याच्या उद्देशानं, G7 देशांनी चार महिन्यांच्या कालावधीत 10 कोटी बॅरल्स तेल बाजारात आणण्याला मान्यता दिली आहे. यामध्ये पहिल्या 20 दिवसांत मोठ्या प्रमाणात डिझेल उपलब्ध करून देण्याचं नियोजन आहे. अमेरिकेत डिझेलचे दर विक्रमी पातळीवर पोहोचल्यानं राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि त्यांच्या प्रशासनावर दबाव वाढला होता, आणि त्यातूनच हा निर्णय घेण्यात आला. ट्रम्प आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्यात झालेल्या चर्चेनंतर ही घोषणा करण्यात आली.

**शिवराजसिंह चौहान**

भारत आणि नेदरलँड्स दरम्यान कृषीविषयक सहकार्य अधिक वृद्धींगत करण्यासाठी केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी नेदरलँड्सचे कृषीमंत्री सिल्व्हियो एर्केन्स यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. नवी दिल्ली इथं नुकत्याच झालेल्या या बैठकीत आधुनिक तंत्रज्ञान, नवोन्मेष आणि कृषी उत्पादकता वाढवण्याच्या निर्धाराचा उभय देशांनी पुनरुच्चार केला.

**नौदल परिषद**

नवी दिल्लीत द्विवार्षिक नौदल कमांडर परिषद काल पार पडली. या तीन दिवसांच्या परिषदेत कार्यान्वयन सज्जता, दळण वळण, देखभाल, प्रशिक्षण आणि मनुष्यबळ व्यवस्थापन आदी बाबींवर विचारमंथन करण्यात आलं. भारतीय नौदलानं आत्मनिर्भरतेच्या दिशेनं केलेल्या प्रयत्नांची संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनीप्रशंसा केली. तर सेमीकंडक्टर, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि क्वांटम तंत्रज्ञानाचा अवलंब अधिक वेगानं करून याबाबत देशांतर्गत क्षमता सक्षम करण्याची गरज इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री जितीन प्रसाद यांनीअधोरेखित केली.

**राष्ट्रीय महिला आयोग**

बालसंगोपनासाठी आई आणि वडिलांना दिल्या जाणाऱ्या रजांबाबत राष्ट्रीय महिला आयोगानं केंद्र सरकारला काही शिफारशी केल्या आहेत. खाजगी क्षेत्रात बाल संगोपनासाठी लिंग-भेद विरहित रजा लागू करणं, म्हणजेच वडिलांनाही पगारी रजा देण्याची शिफारस आयोगानं केली आहे. असंघटित क्षेत्र तसंच गिग कामगार वर्गालादेखील मातृत्व आणि बाल संगोपन रजेची सुविधा द्यावी; आणि 2030 पर्यंत पाच लाख पाळणाघरांची स्थापना करण्यासंदर्भातही शिफारस करण्यात आली आहे. आयोगानं या शिफारशी कार्मिक आणि प्रशिक्षण विभाग, महिला आणि बाल विकास मंत्रालय तसंच श्रम मंत्रालयाला पाठवल्या आहेत.

**भाषा-केंद्र**

अभिजात मराठी भाषा अध्ययन उत्कृष्टता केंद्र स्थापन करण्याची राज्य सरकारची मागणी केंद्रानं मान्य केली असून पुण्यातील डेक्कन कॉलेज पदव्युत्तर आणि संशोधन संस्थेमध्ये केंद्र होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल समाजमाध्यवरील संदेशात ही माहिती दिली. अभिजात मराठी भाषा दिनाच्या पूर्वसंध्येला हा निर्णय झाल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी राज्यातील जनतेतर्फे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आहेत.

**गांधी-शास्त्रीजी-जयंती**

राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त काल त्यांना देशभरातून आदरांजली वाहण्यात आली. राजघाट इथं बापूंच्या समाधीस्थळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह काँग्रेसचे अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि अन्य मान्यवरांनी आदरांजली अर्पण केली. विजय घाट इथं माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांनाही काल आदरांजली अर्पण करण्यात आली.

जगभरातील भारतीय दूतावासांनीही काल महात्मा गांधींची 157 वी जयंती साजरी केली आणि त्यानिमित्त सत्य, शांतता आणि अहिंसा या त्यांच्या संदेशाचं शाश्वत महत्त्व अधोरेखित केलं. चीन, जपान, पाकिस्तान, नेपाळ, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, बहरीन आणि दक्षिण कोरिया इथंही जयंतीचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

मंगोलिया, सौदी अरेबिया, दक्षिण आफ्रिका आणि तुर्की येथील भारतीय दूतावासांनीही गांधी जयंती साजरी केली. या कार्यक्रमांच्या माध्यमातून 'आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन' देखील साजरा करण्यात आला आणि अनेक ठिकाणी सांस्कृतिक आणि संगीतमय कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

**पंतप्रधान-भेटवस्तु लिलाव**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मिळालेल्या भेटवस्तूंच्या ई-लिलावाच्या आठव्या आवृत्तीची मुदत 31 ऑक्टोबरपर्यंत वाढवण्यात आली आहे.यामध्ये दिल्लीचे विविध पैलू दर्शवणाऱ्या 30 वेगवेगळ्या स्मृतीचिन्हांचा समावेश असून दिल्ली मेट्रोचे दोन मॉडेल्स, खेळांशी संबंधित एक वस्तू, एक चित्रकलाकृती, तसंच अन्य कलाकुसरीच्या वस्तूंचाही समावेश आहे, अशी माहिती संस्कृती मंत्रालयानं दिली आहे. या लिलावाद्वारे संकलित होणारा निधी 'नमामि गंगे' प्रकल्पासाठी वापरण्यात येणार असून लिलावाच्या तारखा, आणि भेटवस्तूंची माहिती पाहण्यासाठी पीएमईमूमेंटोज डॉट जीओव्ही डॉट इन या संकेतस्थळाला भेट द्यावी असं आवाहन करण्यात आलं आहे.

**क्रिकेट**

भारत आणि वेस्ट इंडीज यांच्यातला एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतला तिसरा आणि शेवटचा सामना आज चंदीगड इथं खेळला जाणार आहे. मालिकेतील सुरुवातीचे दोन्ही सामने जिंकून भारतानं या मालिकेत विजयी आघाडी घेतली आहे.

**आशियाई क्रीडा**

जपानमधील आयची-नागोया इथं सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेच्या 13व्या दिवशी काल भारतीय खेळाडूंनी हॉकी, मुष्टियुद्ध, कुस्ती आणि तिरंदाजी या क्रीडा प्रकारांमध्ये एकंदर सहा तर आज सकाळी तीरंदाजीमध्ये एक सुवर्णपदक जिंकलं.

अंतिम सामन्यात भारतीय महिला हॉकी संघानं गतविजेत्या चीनचा 1-0 असा पराभव करून सुवर्णपदक पटकावलं. या विजयामुळं भारतानं 44 वर्षांनंतर आशियाई क्रीडा स्पर्धेत महिला हॉकीचं सुवर्णपदक जिंकलं आहे. तसंच महिला हॉकी संघानं 2028 च्या लॉस एंजेलिस ऑलिम्पिकमधील थेट प्रवेशही निश्चित केला आहे.

तत्पूर्वी, भारतीय कुस्तीपटू सुजीत कलकल यानं पुरुषांच्या 65 किलो फ्रीस्टाईल प्रकारात उल्लेखनीय पुनरागमन करत सुवर्णपदक जिंकलं.मुष्टियुद्धामध्ये, परवीन हुडानं महिलांच्या 65 किलो वजनी गटात सुवर्णपदक जिंकलं; पुरुषांच्या 80 किलो वजनी गटात अंकुश पांघलनं दक्षिण कोरियाच्या किम मिनसोंगचा पराभव करून सुवर्णपदक पटकावलं.

भारताची आघाडीची महिला मुष्टियुद्ध खेळाडू लोव्हलिना बोरगोहेन हिनंही 75 किलो वजनी गटात सुवर्णपदक जिंकलं; 2014 मध्ये मेरी कोमनं जिंकलेल्या सुवर्णपदकानंतर, आशियाई क्रीडा स्पर्धेतील महिला मुष्टियुद्धामधील भारताचं हे केवळ दुसरंच सुवर्णपदक आहे.

तिरंदाजीमध्ये, महिलांच्या रिकर्व्ह संघानं आशियाई क्रीडा स्पर्धेत आपलं पहिलं-वहिलं सुवर्णपदक जिंकून इतिहास रचला. या दमदार कामगिरीमुळे भारताने पदक तालिकेत पाचवे स्थान गाठले आहे. देशाची पदकांची एकंदर संख्या 77 वर पोहोचली असून, यात 17 सुवर्ण, 25 रौप्य आणि 35 कास्य पदकांचा समावेश आहे.

**<u>हवामान</u>**

हवामान विभांगानं अरुणाचल प्रदेशात आज मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. आसाम, घालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरामध्ये वादळी पावसाचा अंदाज वर्तववण्यात आला आहे. आंध्र प्रदेश, केरळ, लक्षद्वीप, पश्चिम बंगाल आणि सिक्कीममध्येही अशीच परिस्थिती असू शकते. तर कोकण आणि गोव्यात आज उष्ण आणि दमट हवामान जाणवू शकतं असं हवामान विभागानं सांगितलं आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.